**L. A. BILL No. XXXIII OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३.**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९७१ चा महा. २८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करणे, आणि शिखर तक्रार निवारण समितीशी संबंधित असणारे, त्याखाली केलेले नियम व काढलेली शासकीय अधिसूचना, भूतलक्षी प्रभावाने पुनर्अधिनियमित करणे आणि त्याचे विधिग्राह्यीकरण करणाऱ्या तरतुदी करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर तक्रार निवारण समितीच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,— १९७१ चा महा. २८.

(एक) खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो, ८ मार्च २०१७ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

"(अ-१) "शिखर तक्रार निवारण समिती" याचा अर्थ, कलम ३४अ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली शिखर तक्रार निवारण समिती, असा आहे ;" ;

(दोन) खंड (क-क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क-क) "तक्रार निवारण समिती" याचा अर्थ, कलम ३४ब च्या पोट-कलम (२) अन्वये घटित केलेली तक्रार निवारण समिती, असा आहे ;".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३ब ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ब मध्ये, पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल आणि ते, ८ मार्च २०१७ पासून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"(७) गाळ्याचे किंवा संक्रमण निवासस्थानाचे वाटप करण्याच्या किंवा त्याचे वाटप करण्यास नकार देण्याच्या, आणि सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार, विशिष्ट झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मान्यता देण्याच्या किंवा त्यास नकार देण्याच्या संबंधात, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने ज्याला अधिकार प्रदान केलेले आहेत अशा कोणत्याही अधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही नोटिसांनी, दिलेल्या निदेशांनी किंवा काढलेल्या आदेशांनी व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा नोटिसा, निदेश किंवा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत, शिखर तक्रार निवारण समितीसमोर अपील दाखल करता येईल. अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय, अंतिम असेल.".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३क ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३क मध्ये, पोट-कलम (२) मधील, "तक्रार निवारण समिती" हा मजकूर, ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, "शिखर तक्रार निवारण समिती" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल आणि तो, ८ मार्च २०१७ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३ड ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ड मध्ये,—

(१) खंड (ब) मध्ये,—

(एक) उप-खंड (दोन)(क) मधील, पोट-कलम (४) मध्ये, "तक्रार निवारण समितीकडे" हा मजकूर, ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, "शिखर तक्रार निवारण समितीकडे" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल आणि तो, ८ मार्च २०१७ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (दोन)(ड) मधील, पोट-कलम (५) मध्ये, "तक्रार निवारण समिती" हा मजकूर, ज्या ज्या ठिकाणी आला आहे त्या प्रत्येक ठिकाणी त्या मजकुराऐवजी, "शिखर तक्रार निवारण समिती" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल आणि तो, ८ मार्च २०१७ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(तीन) उप-खंड (दोन)(ह) मध्ये, पोट-कलम (१०) मधील परंतुकातील, "तक्रार निवारण समिती" हा मजकूर, ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, "शिखर तक्रार निवारण समिती" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल आणि तो, ८ मार्च २०१७ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(चार) उप खंड (तीन) मध्ये, कलम १३ मधील, पोट-कलम (३) मध्ये, तिसऱ्या परंतुकातील, "तक्रार निवारण समिती" हा मजकूर, ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, " शिखर तक्रार निवारण समिती" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल आणि तो, ८ मार्च २०१७ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(२) खंड (ई) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक-अ) मधील, विद्यमान कलम ३३ ला त्याचा पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल; आणि असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल आणि ते, ८ मार्च २०१७ पासून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" (२) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने ज्याला अधिकार प्रदान केलेले आहेत अशा कोणत्याही अधिकाऱ्याने पोट-कलम (१) अन्वये पारित केलेल्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, शिखर तक्रार निवारण समितीकडे अपील दाखल करता येईल. अशा अपिलावरील, शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय, अंतिम असेल. " ;

(दोन) उप-खंड (पाच) मध्ये, कलम ३८ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल आणि ते, ८ मार्च २०१७ पासून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" (४) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने ज्याला अधिकार प्रदान केलेले आहेत अशा कोणत्याही अधिकाऱ्याने पोट-कलम (१) अन्वये पारित केलेल्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, शिखर तक्रार निवारण समितीकडे अपील दाखल करता येईल. अशा अपिलावरील, शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय, अंतिम असेल. ".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मध्ये नवीन कलमे ३४अ आणि ३४ब समाविष्ट करणे.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ नंतर,—

(१) पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल आणि ते, ८ मार्च २०१७ पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

शिखर तक्रार निवारण समिती घटित करणे.

" **३४अ.** (१) राज्य शासन, या अधिनियमान्वये तिला सोपविण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करण्याच्या व अशी कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, अध्यक्षाचा व शासनाला योग्य वाटतील अशा संख्येतील सदस्यांचा समावेश असलेली शिखर तक्रार निवारण समिती, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घटित करील.

(२) शिखर तक्रार निवारण समिती, पुढील अधिकार वापरील व कर्तव्ये पार पाडील :-

(एक) या अधिनियमाअन्वये तरतूद केल्याप्रमाणे, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने ज्याला अधिकार प्रदान केलेले आहेत अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या आदेशाविरूद्धच्या अपिलांची सुनावणी करणे आणि ते निकालात काढणे ;

(दोन) राज्य शासनाने तिच्याकडे निर्दिष्ट केलेले कोणतेही प्रश्न किंवा बाबी.

(३) शिखर तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षाच्या व सदस्यांच्या अर्हता, तिच्या बैठकींतील कामकाज चालविण्यासाठी अनुसरण करावयाची कार्यपद्धती आणि तिच्या बैठकींतील गणपूर्ती, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.";

(२) अशा प्रकारे समाविष्ट केलेल्या कलम ३४अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

तक्रार निवारण समिती घटित करणे.

" **३४ब.** (१) राज्य शासन, या अधिनियमान्वये तिला सोपविण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करण्याच्या आणि अशी कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, अध्यक्षाचा व शासनाला योग्य वाटतील अशा संख्येतील सदस्यांचा समावेश असलेली तक्रार निवारण समिती, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घटित करील.

(२) तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षाच्या व सदस्यांच्या अर्हता, तिच्या बैठकींतील कामकाज चालविण्यासाठी अनुसरण करावयाची कार्यपद्धती आणि तिच्या बैठकींतील गणपूर्ती, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल. ”.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये,—

(१) पोट-कलम (१अ) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

“ (१अ) पोट-कलम (१) खालील अपील प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशांनी व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत, तक्रार निवारण समितीसमोर अपील दाखल करता येईल. अशा अपिलावरील, तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम असेल.”;

(२) पोट-कलम (५) वगळण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४२ मधील, “ तक्रार निवारण समितीस ” या मजकुराऐवजी, “ तक्रार निवारण समितीस व शिखर तक्रार निवारण समितीस ” हा मजकूर, दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (तक्रार निवारण समिती) नियम, २०१४ चे भूतलक्षी प्रभावाने पुनर्अधिनियमितीकरण करणे.

**९.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अथवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शिखर तक्रार निवारण समितीशी संबंधित असणारे, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (तक्रार निवारण समिती) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “ नियम ” असा केला आहे), २३ फेब्रुवारी २०१७ पासून, भूतलक्षी प्रभावाने यथोचितरीत्या व वैधरीत्या राज्य शासनाद्वारे पुनर्अधिनियमित करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि जणू काही ते, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये राज्य शासनाद्वारे, कायद्यानुसार करण्यात आलेले आहेत असे समजून, सर्व वेळी, अंमलात आले असल्याचे मानण्यात येतील.

१९७१ चा महा. २८.

शिखर तक्रार निवारण समिती घटित करण्याशी संबंधित असणाऱ्या दिनांक ८ मार्च २०१७ च्या शासकीय अधिसूचनेचे भूतलक्षी प्रभावाने पुनर्अधिनियमितीकरण करणे.

**१०.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अथवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शिखर तक्रार निवारण समिती घटित करण्याशी संबंधित असणारी, शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण विभाग, क्रमांक झोपसु. १००८/प्र.क्र. १४३(१)/झोपडपट्टी-१, दिनांक ८ मार्च २०१७ (यात यापुढे जिचा निर्देश, “ अधिसूचना ” असा केला आहे) ही, दिनांक ८ मार्च २०१७ पासून, भूतलक्षी प्रभावाने यथोचितरीत्या व वैधरीत्या राज्य शासनाद्वारे पुनर्अधिनियमित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि जणू काही ती, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये राज्य शासनाद्वारे, कायद्यानुसार काढण्यात आली आहे असे समजून, सर्व वेळी, अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल.

१९७१ चा महा. २८.

कायदेशीर कार्यवाह्या रद्द करणे.

**११.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर तक्रार निवारण समितीच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३ याच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१, किंवा शिखर तक्रार निवारण समितीच्या संबंधात त्याखाली केलेले नियम किंवा काढलेल्या अधिसूचना यांनुसार, शिखर तक्रार निवारण समितीने दिलेले आदेश, निर्णय, काढलेल्या नोटिसा, काढलेली परिपत्रके, केलेले ठराव, दिलेले निदेश किंवा तिच्या कोणत्याही कार्यवाह्या यांच्या संबंधात, कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकरणासमोर प्रलंबित असलेल्या सर्व कायदेशीर कार्यवाह्या, शिखर तक्रार निवारण समितीची रचना आणि तिचे अधिकार व कर्तव्ये उक्त अधिनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे नव्हते आणि उक्त समितीला, मुख्य अधिनियमान्वये तसे करण्याची अधिकारिता नव्हती किंवा तसे करण्यास ती कायदेशीरदृष्ट्या सक्षम नव्हती, ह्या कारणावरून, रद्द होतील.

२०२३ चा महा. .

१९७१ चा महा. २८.

१९७१ चा महा. २८.

२०२३ चा महा.......

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**१२.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ८ मार्च २०१७ पासून प्रारंभ होणाऱ्या आणि महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर तक्रार निवारण समितीच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " सुधारणा अधिनियम " असा केला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीमध्ये, उक्त अधिनियम, नियम व अधिसूचना यांअन्वये शिखर तक्रार निवारण समितीने दिलेल्या आदेशांसह केलेल्या किंवा हाती घेतलेल्या सर्व कृती, कार्यवाह्या किंवा गोष्टी ह्या, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही सर्व वेळी, सातत्याने अंमलात आल्या होत्या असे समजून, कायद्यानुसार यथोचितरीत्या व वैधरीत्या हाती घेण्यात किंवा करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येतील आणि त्यानुसार, उक्त समितीने, दिलेल्या आदेशांनुसार, कोणत्याही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संबंधात कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने हाती घेतलेल्या सर्व कारवाया किंवा केलेल्या कार्यवाह्या किंवा गोष्टी ह्या, सर्व प्रयोजनांसाठी उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार, करण्यात आलेल्या असल्याचे किंवा हाती घेण्यात आलेल्या असल्याचे मानण्यात येतील आणि त्या नेहमीकरिता करण्यात आलेल्या असल्याचे किंवा हाती घेण्यात आलेल्या असल्याचे मानण्यात येतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१३.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणतांना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश, काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

# उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यातील झोपडपट्ट्यांची सुधारणा व निर्मूलन करण्यासाठी आणि त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी आणि निष्कासित होण्यापासून व अटकावणी अधिपत्रांपासून भोगवटादारांचे संरक्षण करण्यासाठी अधिक चांगल्या तरतुदी करण्याकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. २८) अधिनियमित केला आहे. उक्त अधिनियमाच्या प्रकरण एक-अ मध्ये संरक्षित भोगवटादारांचे पुनःस्थाननिश्चयन व पुनर्वसन करण्यासाठी राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे, झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करण्याची तरतूद केली आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे, निपटारा आदेश काढणे, निष्कासन आदेश काढणे, इत्यादींच्या संबंधात, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिलेल्या आदेशांविरूद्ध, राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे घटित केलेल्या तक्रार निवारण समित्यांसमोर, अपील दाखल करण्याची तरतूद केलेली आहे.

तथापि, शासनाने, उक्त अधिनियमाच्या कलम ३५ खालील अपील अधिकारांचा वापर करण्यासाठी शिखर तक्रार निवारण समिती व तक्रार निवारण समिती घटित करण्यासाठी ८ मार्च २०१७ रोजी अधिसूचना काढलेली आहे. शिखर तक्रार निवारण समितीसह तक्रार निवारण समितीचे कामकाज चालविण्याची कार्यपद्धती विहित करण्याकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (तक्रार निवारण समिती) नियम, २०१४ तयार केलेले आहेत. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मध्ये, त्यासाठी तरतुदी न करताच, शिखर तक्रार निवारण समितीशी संबंधित असलेली, उक्त अधिसूचना काढलेली आहे व उक्त नियम केलेले आहेत.

३. म्हणून, शिखर तक्रार निवारण समितीची रचना आणि तिचे अधिकार व कार्ये यांसाठी भूतलक्षी प्रभावाने तरतूद करण्याकरिता, आणि त्याकरिता आवश्यक असलेल्या विधिग्राह्यकारी तरतुदी करण्यासाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यामध्ये सुयोग्य सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनाला वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **अतुल सावे,**

दिनांक २४ जुलै, २०२३. गृहनिर्माण मंत्री.

し

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ६.**—महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यामध्ये नवीन कलमे ३४अ व ३४ब समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये,—

(अ) **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, शिखर तक्रार निवारण समिती व तक्रार निवारण समिती घटित करण्याचा अधिकार; आणि

(ब) शिखर तक्रार निवारण समितीच्या व तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षाच्या व सदस्यांच्या अर्हता, त्यांच्या बैठकींतील कामकाज चालविण्यासाठी अनुसरण करावयाची कार्यपद्धती व त्यांच्या बैठकींतील गणपूर्ती विहित करण्याकरिता नियम करण्याचा अधिकार,

राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १३.**—या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती दूर करण्यासाठी आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

(शा.म.मु.) एचबी १०५१—२ (१०४६-७-२०२३)

**सन २०२३ चे वि. स. विधेयक क्रमांक ३३—महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर तक्रार निवारण समितीच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**[महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यातील उतारे]**

**(सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८)**

**१.** ** ** **

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) ते (अ-ब) ** ** **

(१ब) ** ** **

(बअ) ** ** **

(ब- एक) व (ब-दोन) ** ** **

(क-अ) व (क-ब) ** ** **

(क-क) "तक्रार निवारण समिती म्हणजे" कलम ३५ अन्वये घटित केलेली तक्रार निवारण समिती,

(ड) ते (ज) ** ** **

**३.** (१) व (२) ** ** **

**३अ.** व **३ब.** ** ** **

**३क.** (१) ** ** ** झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, तक्रार निवारण समितीकडे अपील दाखल करता येईल. अशा अपिलातील, तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम असेल."

(३) ** ** **

**३ड.** ** ** ** झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राला या अधिनियमाची इतर प्रकरणे फेरफारांसह लागू करणे.

(अ) ** ** **

(ब) (एक) ** ** **

(दोन) (अ) व (ब) ** ** **

(क) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल,—

(४) निर्मूलन आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, निर्मूलन आदेश कायम केल्याची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, तक्रार निवारण समितीकडे अपील दाखल करता येईल, अशा अपिलामधील तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम असेल.

(ड) पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलम, दाखल करण्यात येईल,—

(५) जेथे असे कोणतेही अपील यथोचितरीत्या करण्यात आले असेल तेथे—

(अ) तक्रार निवारण समितीला अंतरिम आदेशाद्वारे एकतर सर्वसाधारणपणे किंवा त्याचा कोणत्याही मालमत्तेवर जितपत परिणाम होईल तितपत अपिलावर अंतिम निर्णय होईपर्यंत निर्मूलन आदेशाची कार्यवाही स्थगित ठेवता येईल ;

(ब) तक्रार निवारण समितीचा सदर निर्मूलन आदेश हा या अधिनियमाच्या अधिकारांतर्गत येत नसल्याबाबत किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही आवश्यकतेची पूर्तता करण्यात आली नसल्यामुळे अपिलकर्त्याच्या हितसंबंधाला मोठ्या प्रमाणात बाधा पोचली असल्याबद्दल सुनावणी घेतल्यानंतर खात्री पटली असेल तर सदर निर्मूलन आदेश एकतर सर्वसाधारणपणे अथवा अपिलकर्त्याच्या कोणत्याही मालमत्तेवर जितपत परिणाम होईल तितपत तो रद्दबातल करता येईल;

(क) निर्मूलन आदेशाच्या अशा घोषणेसंबंधातील व अंमलबजावणी संबंधातील अफावरील तक्रार निवारण समितीचा निर्णय हा अंतिम असेल."

(ई) ते (जी) ** ** **

(ह) (अ) व (ब) ** ** **

(एक) ** ** **

(दोन) पोट-कलम (१०) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१०) या अधिनियमाच्या आणि नगररचनेसंबंधी व इमारत उभारण्याचे नियमन करण्यासंबंधी त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदीस अधीन राहून, निर्मूलनाचा आदेश परिणामक झालेला असेल त्याबाबतीत, त्या जमिनीस तो निर्मूलन आदेश लागू असेल अशा जमिनीच्या मालकास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या नकाशानुसार आणि प्राधिकरणास जे निर्बंध व शती (ज्या वेळेच्या आत पुनर्विकास झाला पाहिजे त्या वेळेसंबंधीची शर्त धरून) कोणत्याही असल्यास, त्यास अधीन राहून जमिनीचा पुनर्विकास करता येईल :

परंतु, जो मालक त्याच्या जमिनीच्या वापरकर्त्यावर अशा रीतीने लादलेल्या निर्बंधामुळे किंवा शर्तीमुळे किंवा असे कोणतेही निर्बंध किंवा शर्त रद्द करण्यास किंवा त्यात फेरबदल करण्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने नंतर नकार दिल्यामुळे, व्यथित झालेला असेल त्यास, तक्रार निवारण समितीकडे अपील करता येईल आणि लादण्यात आलेले निर्बंध व शर्ती यांसंबंधीचा तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम असेल.";";

(तीन) ** ** **

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राचा विकास करण्याचा अधिकार.

**१३.** (१) व (२) ** ** **

(३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत, अशा रीतीने नियुक्त केलेल्या अभिकरणाने किंवा इतर विकासकाने, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात आल्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी आणि पुनर्वसन गाळ्यांच्या बांधकामासाठी मान्यता घेण्याकरिता कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाला, स्थानिक संस्थाना केलेल्या प्रदानासाठी सोडून जाणारा जमीन मालक किंवा भोगवटादार किंवा, यथास्थिति, विकासक यांनी केलेल्या खर्चाकरिता त्यांना देय असणारी नुकसानभरपाईची रक्कम जमा करण्याची आवश्यकता असेल :

परंतु, अशी नुकसानभरपाई, जमीन मालकाने, किंवा, भोगवटादाराने किंवा यथास्थिति, पूर्वीच्या विकासकाने कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराला केलेली सशर्त आबंधने भागविण्यासाठी बांधकामासंबंधी केलेल्या कोणत्याही खर्चाकरिता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने नियुक्त केलेल्या अभिकरणाद्वारे देय नसेल. असा आदेश देण्यापूर्वी, मुख्य कार्यकारी अधिकारी, त्याच्यावतीने स्वतंत्रपणे नियुक्त केलेल्या मान्यताप्राप्त मूल्यनिर्धारकाकडून आणि संबंधित पक्षकारांकडून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यासमोरील कार्यवाहीसाठी अहवाल मिळवील :

परंतु आणखी असे की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने असा आदेश देण्यापूर्वी, संबंधित जमीनमालक किंवा भोगवटादार किंवा, यथास्थिति, विकासक यांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल आणि असा आदेश का देण्यात येऊ नये याची कारणे देण्याबाबत तीस दिवसांहून अधिक नसेल इतकी मुदत त्याकरिता देण्यात येईल :

परंतु तसेच, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या आदेशावरील अपील, कोणतेही असल्यास, तक्रार निवारण समितीसमोर दाखल करण्यात येईल आणि तक्रार निवारण समितीचा आदेश अंतिम असेल व तो सर्व पक्षकारांवर बंधनकारक असेल.

(क) ते (ई) ** ** **

३-ई ते ३-झ-७ ** ** **

**४.** ते **३४.** ** ** **

**३५.** (१) ** ** ** अपिले.

(१अ) कोणत्याही व्यक्तीस–

(अ) पोट-कलम (१) अन्वये अपील प्राधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही नोटिशीने, काढलेल्या आदेशाने किंवा दिलेल्या निदेशांनी व्यथित झालेली, अशी नोटिस दिल्याच्या, आदेश काढल्याच्या किंवा निदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत,

(ब) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून कलम ३ क खालील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याच्या आणि कलम १२ खाली देण्यात आलेल्या झोपडपट्टी निर्मूलन आदेशाच्या, किंवा तसेच विनिर्दिष्ट कालमर्यादेच्या आत परवानगी आणि मान्यता यांनुसार प्रकल्प हाती न घेणाऱ्या किंवा तो पूर्ण न करणाऱ्या मालकाच्या किंवा विकासकाच्या विरुद्ध कलम १३ खाली देण्यात आलेल्या आदेशाच्या, किंवा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातून झोपडपट्टी रहिवाशांच्या निष्कासनाच्या संबंधी कलम ३ड खाली देण्यात आलेल्या आदेशाच्या संबंधातील आणि झोपडपट्टी रहिवाशांच्या पात्रतेसंबंधातील, गाळा नाकारत असलेले पात्र झोपडपट्टी रहिवासी, संक्रमण निवासव्यवस्था उपलब्ध नसेल किंवा ती पुरविण्यात आली नसेल, या आणि यांसारख्या अन्य बाबींसंबंधातील कोणताही विवाद मिटविण्याच्या प्रयोजनासाठी :

राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा क्षेत्राकरिता घटित केलेल्या आणि अध्यक्ष व शासनास योग्य वाटेल इतक्या सदस्यांचा समावेश असलेल्या तक्रार निवारण समितीसमोर अपील दाखल करता येईल. समितीच्या अध्यक्ष व सदस्यांची अर्हता आणि तिचे कामकाज चालविण्यासाठी अनुसरण्याची पद्धत विहित केल्याप्रमाणे असेल.

(२) ते (४) ** ** **

(५) प्रशासकाने अपिलावर दिलेला निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर हरकत घेतली जाणार नाही.

**३६.** ते **४१.** ** ** **

**४२.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतुद करण्यात आली असेल त्याखेरीज, ज्या कोणत्याही बाबीचा निर्णय करण्याचे अधिकार या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अपील प्राधिकाऱ्यास, सक्षम प्राधिकरणास, तक्रार निवारण समितीस किंवा न्यायाधिकरणास प्रदान करण्यात आले असतील त्या बाबीसंबंधात कोणत्याही दिवाणी न्यायालयास अधिकारीता असणार नाही; आणि या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारानुसार केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयाने किंवा इतर प्राधिकाऱ्याने मनाई आदेश मंजूर करता कामा नये. अधिकारितेस रोध.

**४३.** ते **४७.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३.]**

**[महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. अतुल सावे,**
गृहनिर्माण मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई